सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

नियोजन विभाग, महाराष्ट्र राज्य

सारथी
शाहू विचारांना देऊया गती, साधूया सर्वांगीण प्रगती

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३, बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

Email ID : sarthipune@gmail.com | CIN - U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in | 020-25592502

अधिसूचना क्रमांक: सारथी/स्पर्धा परीक्षा /MPSC/मुख्य परीक्षा २०२५ प्रायोजकत्व/

## मार्गदर्शक सूचना

### महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण लक्षित गटातील विद्यार्थ्यांना सारथी मार्फत मुख्य परीक्षेकरिता एकरकमी आर्थिक साहाय्य प्रायोजकत्व

महाराष्ट्र राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी प्रवर्गातील महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा, वन सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण उमेदवारांना सारथी मार्फत मुख्य परीक्षेच्या तयारीकरिता एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व करिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

- ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख : दि.२२/४/२०२६
- ऑनलाईन अर्ज व अपलोड केलेल्या कागदपत्रे स्वयं साक्षांकित प्रत (हार्ड कॉपी) सारथी मुख्यालय, पुणे येथे पाठविण्याची शेवटची तारीख : दि..२४/४/२०२६
- छायांकित प्रत (हार्ड कॉपी) पाठविण्याकरिता पत्ता : सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३,बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र)- ४११००४

अर्ज करण्यासाठी सारथी, पुणे संस्थेच्या https://sarthi.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावरील सूचना फलकमधील " महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा -सारथी मुख्य परीक्षा प्रायोजकत्व" या लिंकवर सदर 'मार्गदर्शक सूचना' वाचून ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत भरावा. ऑनलाईन अर्जात सुस्पष्ट व सर्व स्वयं साक्षांकित कागदपत्रे व्यवस्थित स्कॅनकरून अपलोड करावीत. तसेच ऑनलाईन अर्जामध्ये भरलेल्या सर्व कागदपत्रांची स्वयं साक्षांकित प्रत (अधिसूचना मुद्दा क - क्र.५ मध्ये दिलेल्या क्रमाने) तसेच ईमेलवर प्राप्त ऑनलाईन अर्जाची प्रत सारथी सारथी मुख्यालय पुणे (सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३,बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र)- ४११००४) येथे पाठविण्याची अंतिम मुदत दि. २४/४/२०२६ आहे.

*अ] महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा - मुख्य परीक्षा २०२५ करिता एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व लाभाचे स्वरुप :*

१. मुख्य परीक्षा तयारीकरिता उमेदवाराला एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व रु.१५,०००/- फक्त.

*ब] पात्रता :*

१) जाहिरात क्र.०१२/२०२५,दि.२७/२/२०२६ व दि.४/३/२०२६ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिद्ध निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा पूर्व परीक्षा २०२५ द्वारे उमेदवार उत्तीर्ण असावा.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी तसेच मराठा, कुणबी, कुणबी-मराठा आणि मराठा-कुणबी या सारथी लक्षित गटातील असावा.

३) उमेदवाराला नॉन-क्रीमीलेयर श्रेणीमध्ये असणे आवश्यक आहे.

४) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.आठ लाखापेक्षा कमी असावे.

*क] प्रायोजकत्वासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया :*

१. सारथी संस्थेच्या https://sarthi.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन संकेतस्थळावर प्रकाशित केलेल्या "महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा), महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा तसेच वन सेवा -मुख्य परीक्षा प्रायोजकत्व" संबंधित अधिसूचनेतील मागदर्शक व महत्त्वाच्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

२. मागदर्शक सूचना वाचल्यानंतरच ऑनलाईन अर्ज भरावा, अर्ज पूर्ण भरल्यानंतर तुम्ही भरलेली माहिती अचूक असल्याची व अपलोड केलेले कागदपत्रे योग्य व स्पष्ट असल्याची खात्री करावी, तद्नंतरच ऑनलाईन अर्ज सबमिट करावा.

३. अर्ज सबमिट केल्यानंतर, अर्ज डाउनलोड करावा (किंवा अर्ज सबमिट केल्यानंतर तुम्हाला ईमेलवर मिळणारा प्रतिसाद), त्याची एक झेरॉक्स प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करावी.

४. वेबसाइटवरून चेकलिस्ट डाउनलोड करावी, चेकलिस्ट मध्ये संपूर्ण तपशील भरावा आणि त्यावर स्वाक्षरी करावी.

५. खालील नमूद सर्व कागदपत्रांचा संच तयार करावा, सुरुवातीस एका पानावर तुमचे पूर्ण नाव, संपर्क क्रमांक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा पूर्व परीक्षा २०२५ आसन क्रमांक लिहावा. खाली दिलेल्या अनुक्रमानुसार सर्व कागदपत्रांची स्वयं:साक्षांकित संच तयार करावा: ( एससीबीसी दाखला/नॉन क्रिमीलेयर २०२५-२६ साठी वैध असलेले असणे आवश्यक आहे.)

i. चेकलिस्ट

ii. स्वतःची पुष्टी केलेला फॉर्म (किंवा फॉर्म सबमिट केल्यानंतर तुम्हाला मिळणारा प्रतिसाद ईमेल)

iii. जात प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/ एससीबीसी दाखला (कोणताही एक)

iv. शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य (जातीचा उल्लेख आवश्यक) (फक्त कुणबी विद्यार्थ्यांसाठी)

v. नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र व तहसीलदार यांच्या सहीने निर्गमित केलेला मागील तीन वर्षाचे (आर्थिक वर्ष २०२३-२४, २०२४-२५,२०२५-२६) रु.आठ लाखापेक्षा कमी उत्पन्न दर्शविणारा मूळ उत्पन्न दाखला (कुणबी विद्यार्थ्यांसाठी नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र अनिवार्य आहे.) (कोणताही एक)

vi. अधिवास प्रमाणपत्र

vii. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा पूर्व परीक्षा २०२५ प्रवेशपत्राची प्रत

viii. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहिर केलेल्या निकालावर ज्या पृष्ठावर विद्यार्थ्यांचा आसन क्र./ नाव आहे, फक्त त्याच पृष्ठाची प्रत (आसन क्रमांक हायलाईट करावा).

ix. आधार कार्ड

x. अलीकडील काळातील एक पासपोर्ट आकाराचे रंगीत फोटो (चेकलिस्टमध्ये जोडा)

xi. नाव/आडनावात कोणताही बदल असल्यास पुराव्यासाठी कोणताही कागदपत्र (विवाह प्रमाणपत्र/राजपत्र इ.)

xii. उमेदवार दिव्यांग असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची स्वयं:साक्षांकित प्रत

xiii. उमेदवार अनाथ असल्यास सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या प्रमाणपत्राची स्वयं:साक्षांकित प्रत

xiv. कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची एक स्पष्ट झेरॉक्स प्रत (बँक खाते आणि पासबुक उमेदवाराचे असणे आवश्यक आहे; नातेवाईक किंवा पालकांचे पासबुक कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही) तसेच व्यवहार करता यावा यासाठी खाते चालू असले पाहिजे. उमेदवारांच्या खात्याशी संबंधित समस्यांमुळे व्यवहारात कोणतीही अडचण झाल्यास, त्याची जबाबदारी सारथीची राहणार नाही.

**उपरोक्त नमूद केलेल्या अनुक्रमानुसार सर्व कागदपत्रांची स्वयं:साक्षांकित प्रत तयार करुन त्याची हार्ड कॉपी खालील दिलेल्या पत्त्यावर विहित मुदतीत सादर करावी.( महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/ महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा - मुख्य परीक्षा एकरकमी आर्थिक प्रायोजकत्वकरिता अर्ज करणाऱ्या सर्वच अर्जदारांनी या एकाच पत्त्यावर हार्ड कॉपी पाठवावी)**

**प्रति,**

**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), विभागीय कार्यालय पुणे.**

**पत्ता : सारथी मुख्यालय, सीटी सर्वे नंबर १७३,बी/१, सेनापती बापट रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र)- ४११००४**

**विषय : सारथी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/ महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा एकरकमी आर्थिक प्रायोजकत्व** (*ज्या परीक्षेच्या प्रायोजकत्व साठी अर्ज केला आहे ती परीक्षा नमूद करावी)

**टीप :**

- **संकेतस्थळावर घोषित केलेल्या शेवटच्या तारखेच्या आत कागदपत्र पडताळणीसाठी ऑनलाईन फॉर्म आणि वरील कागदपत्रांच्या हार्ड कॉपी दाखल करावीत त्यानंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही.**
- **उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची पडताळणी करुनच अंतिम पात्र विद्यार्थी यादी घोषित करण्यात येईल व प्रायोजकत्वास पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाच सदर प्रायोजकत्व रक्कम अदा करण्यात येईल.**

- उमेदवारांनी सद्यस्थितीत चालू असलेलाच ईमेल आयडी आणि संपर्क क्रमांक ऑनलाईन अर्जामध्ये भरावा. संपर्क क्रमांक बंद असणे किंवा ईमेल प्राप्त न होणे किंवा सारथी कडून पाठविलेले ईमेल/मेसेजेस न वाचणे, यासाठी सारथी जबाबदार राहणार नाही.
- सारथी संस्थेकडून दिली जाणारी ही आर्थिक मदत फक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्य सेवा)/महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा/वन सेवा मुख्य परीक्षा २०२५च्या प्रायोजकत्वासाठी लागू आहे.
- कागदपत्र पडताळणीसाठी स्वयं:साक्षांकित झेरॉक्स प्रतींच्या हार्ड कॉपी ऐवजी ईमेलवरून कोणत्याही सॉफ्ट कॉपी विचारात घेतल्या जाणार नाहीत, हार्ड कॉपीचा संच सादर करणे अनिवार्य आहे.
- महाज्योती किंवा इतर कोणत्याही संस्थेत समान प्रायोजकत्वासाठी अर्ज करणारे उमेदवार या प्रायोजकत्वासाठी पात्र नाहीत, जर विद्यार्थ्यांनी सदर माहिती लपवली व ते सिद्ध झाल्यास प्रायोजकत्वाच्या कोणत्याही पातळीवर संबंधित उमेदवारांकडून सारथी संस्थेमार्फत दिलेल्या प्रायोजकत्वाची पूर्ण रक्कम वसूल करण्यात येईल.
- सारथी संकेतस्थळावर प्रसिद्ध ऑनलाईन अर्ज, व्यवस्थित व विहित मुदतीत भरलेला असल्यास कागदपत्रे पडताळणीसाठी विचारात घेतला जाईल. केवळ ऑनलाईन अर्ज भरणे किंवा फक्त हार्ड कॉपी सबमिट करणे विचारात घेतले जाणार नाही; ऑनलाईन अर्ज आणि हार्ड कॉपी दोन्ही दिलेल्या वेळेत दाखल करणे आवश्यक आहे. अर्जदाराने ऑनलाईन अर्ज भरणे आणि प्रायोजकत्वासाठी दिलेल्या वेळेत हार्ड कॉपी सबमिट करणे अनिवार्य आहे. विहित मुदतीत न आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.
- सर्व आवश्यक कागदपत्रांच्या (मुद्दा क्र.५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) स्पष्ट झेरॉक्स प्रती स्वयं:साक्षांकित करणे आवश्यक आहे.
- उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये दिलेल्या ईमेल आणि संपर्क क्रमांकावरच सारथीद्वारे उमेदवाराशी आवश्यक असल्यास पुढील सर्व संपर्क केले जाईल, त्यामुळे उमेदवाराने ऑनलाईन अर्जामध्ये स्वत:चा सद्यस्थितीत कार्यरत असलेलाच ईमेल आयडी आणि मोबाइल नंबर प्रदान करणे आवश्यक आहे. संपर्क क्रमांक बंद असणे किंवा ईमेल प्राप्त न होणे, यासाठी सारथी संस्था जबाबदार राहणार नाही.
- दिलेल्या विहित मुदतीत सारथी कार्यालयास पोस्ट/कुरिअरद्वारे हार्ड कॉपी पाठवणे ही संपूर्णपणे उमेदवारांची जबाबदारी आहे.

सूचना :

१) सारथी मार्फत UPSC/MPSC/MES/IBPS/SSC इत्यादी प्रशिक्षण चालू असलेले अथवा प्रशिक्षणात निवड झालेले विद्यार्थी या प्रायोजकत्वास करिता पात्र नाही.

२) चालू आर्थिक वर्षात सारथी किंवा महाज्योती किंवा इतर तत्सम संस्थांमार्फत कोणत्याही स्वरुपाचा लाभ घेतला असल्यास उमेदवार सदर प्रायोजकत्वास पात्र राहणार नाही.

३) बंद असलेले बँक खाते, चुकीचा बँक तपशील भरल्यास उमेदवार स्वतः जबाबदार राहील.

स्वाक्षरीत /-
(महेश पाटील) (भा.प्र.से.)
व्यवस्थापकीय संचालक,
छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण
व मानव विकास संस्था (सारथी), पुणे